वाचले :- 1)**पोलीस अधिक्षक, जळगांव यांचे कडील पत्र जा. क्र.**1697/**जिविशा/प्र.का.**/ 2020
**दिनांक** 04/05/2020

2) **मा.जिल्हादंडाधिकारी यांचेकडील आदेश क्र/दंडप्र-1/कावि**/288/2005 **दि**.22/6/2005.

3) **मुंबई पोलीस अधिनियम** 1951 **चे कलम** 37 **चे पोटकलम** (1) **व** (3).

क्रमांक/दंडप्र/1/कावि/2020/106

दिनांक :-05/05 /2020

**आदेश**

पोलीस अधिक्षक, जळगांव यांनी दिनांक 04/05/2020 रोजीचे पत्रान्वये, सध्या संपुर्ण जगभरामध्ये करोना संसर्ग रोगाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढतच असुन संसर्ग रोगामुळे जगामध्ये मृत्युचे प्रमाण वाढतच आहे. जळगाव जिल्हयामध्ये सुध्दा संसर्ग रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने खबरदारीची उपाययोजना म्हणुन नागरीकांनी विनाकाराण गर्दी करु नये. नागरीकांनी मोठ मोठे सण उत्सव, नमाज पठणाचा कार्यक्रम घेऊ नये. याकरीता प्रतिबंधात्मक कारवाईची जरुरी आहे.

दि.07/05/2020 रोजी बुध्द पौर्णिमा तसेच दि.11/05/2020 रोजी संतचोखामेळा पुण्यतिथी, दि.14/05/2020 रोजी धर्मवीर संभाजी महाराज जयंती, दि.16/05/2020 रोजी संत झिपरु आण्णा पुण्यतिथी, दि.17/05/2020 रोजी संत मुक्ताबाई पुण्यतिथी कार्यक्रम आहेत तसेच मुस्लीम बांधवांचा रमजान मास सुरु असल्याने रोजे (उपवास) सुरु होत आहे.

जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी व सार्वजनिक शांततेचा भंग होऊ नये यासाठी यापुर्वी प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले होते. त्यामुळे समाज विघातक कृत्य करणारे जातीयवादी गुंड इत्यादीवर कायदयाचा वचक राहीला होता. हिच परिस्थिती आगामी येणारे राजकीय विरोधी पक्षाचे आंदोलन तसेच इतर सामाजिक,सांस्कृतीक कार्यक्रम राबविणारे संघटना यांच्या वतीने तसेच पारंपारिक पध्दतीने आयोजीत होणारे जयंती, पुण्यतीथी असे अनेक कार्यक्रम घेण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमामध्ये लोकांचा सहभाग वाढल्याने कोरोना संसर्ग रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मिरवणुका, सभा,धार्मीक कार्यक्रम, उत्सव इत्यादीचा फायदा जातीयवादी गुंड घेण्याची शक्यता नाकारता येत नाही शुल्लक कारणावरुन देश विघातक कृत्य करणारे, समाजकंटक, जातीय गुंड हे याचा फायदा घेऊन किंबहुना समाजात तेढ निर्माण होईल, अशांतता निर्माण होईल अश्या प्रकारचे कृत्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेता कोणताही अनुचीत प्रकार घडु नये. यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागु होणे जरुरीचे आहे. ही बाब लक्षात घेता कोणताही अनुचीत प्रकार घडू नये म्हणुन यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागु होणे जरुरीचे आहे. ही बाब लक्षात घेता कोणताही अनुचीत प्रकार घडू नये म्हणुन जळगांव जिल्हयांत **दिनांक** 06/05/2020 **ते दिनांक** 20/05/2020 या कालावधीत मुंबई पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37(1) (3) चे प्रतिबंधात्मक आदेश लागु होणेस विनंती केलेली आहे.

तरी किरकोळ कारणांवरून कोणताही अनुचित प्रकार शक्यता नाकारता येत नसल्याचे पोलीस अधिक्षक, जळगांव यांनी त्यांच्या दिनांक 04/05/2020 च्या पत्रान्वये माझ्या निदर्शनास आणुन दिल्याने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेचे परिरक्षण करण्याकरिता संपूर्ण जळगांव जिल्हा हद्दीत काही कृत्यांवर बंदी घालणे आवश्यक झाल्यामुळे मी, **वामन कदम, अपर जिल्हादंडाधिकारी, जळगांव** उपोद्घाततील अ.नं.2च्या आदेशान्वये मा. जिल्हादंडाधिकारी जळगांव यांनी मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून

इ) सार्वजनिक रित्या ओरडणे, किंवा विक्षिप्तपणे हावभाव करणे,

ई) सभ्यता अगर नितिमत्ता विरुध्द असतील अशी किंवा शांतता धोक्यांत आणतील अशी भाषणे, हावभाव करणे,सोंग आणणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलक, इ. लावणे किंवा इतर कोणतेही असे जिन्नस अगर वस्तु तयार करणे अगर त्यांचा प्रसार करणे या कृत्यांना बंदी घालीत आहे.

वरील कलम 37 (1) अंतर्गतचा हा आदेश ज्यांना हातात लाठी किंवा तत्सम वस्तु घेतल्याशिवाय चालता येत नाही. अशा वृध्द अथवा अपंग इसमांना लागु असणार नाही.

त्याचप्रमाणे मुंबई पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पांच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यांस सबंधित स्थानिक पोलीस स्टेशन यांच्या कार्यालयाची पुर्व परवानगीशिवाय सभा घेण्यांस किंवा मिरवणुका काढण्यांस या आदेशान्वये बंदी घालीत आहे. हा आदेश लग्न मिरवणुका, धार्मिक मिरवणुका, प्रेत यात्रा यांना लागु असणार नाही.

वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यारे बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही.

**हा आदेश दिनांक** :- 06/05/2020 **चे सकाळी** 06.00 **वाजेपासून ते दिनांक** :- 20/05/2020 **चे** 24.00 **वाजेपावेतो अंमलात राहील.**

हा आदेश आज दिनांक:-04 / 05/2020 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी पारीत केला असे.

**(वामन कदम)**
**अपर जिल्हादंडाधिकारी जळगांव**

प्रत:- संचालक येरवडा कारागृह शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय पुणे

2/- उपरोक्त आदेश राजपत्रांत प्रसिध्द करुन आदेश प्रसिध्द झालेल्या राजपत्राच्या 10 जादा प्रती या कार्यालयास पाठवाव्यांत ही विनंती.

प्रत:- पोलीस अधिक्षक, जळगांव

2/-आपले अधिपत्याखालील सबंधीत पोलीस अधिकारी यांना सदर आदेशाच्या प्रती पुरविण्यांत येऊन आवश्यक ती कार्यवाही करणे बाबत सुचित करण्यांत यावे. व या आदेशाची व्यापक प्रसिध्दी करावी.

प्रत:- उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व) व कार्यकारी दंडाधिकारी, (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी ,जळगांव

2/- सोबत आदेशाच्या 5 प्रती पाठविण्यात येत असुन आदेशाची सर्व स्थानिक वर्तमानपत्रातुन विनामुल्य प्रसिध्दी देवुन प्रसिध्दी बाबतचा अहवाल इकडेस सादर करावा.